N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** पौड
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0342 **Year (वर्ष):** 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 12/11/2026 18:21

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
Time Period (कालावधी): पहर 5
Date From (दिनांक पासून): 28/07/2026
Date To (दिनांक पर्यंत): 28/07/2026
Time From (वेळेपासून): 12:37 बजे
Time To (वेळेपर्यंत): 13:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 12/11/2026 **Time (वेळ):** 17:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 014
Date & Time (दिनांक आणि वेळ): 12/11/2026 17:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 09 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** घोटावडे मंडल कार्यालय,तामुळशी,जिपुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अशोक लक्ष्मण गवारी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे ,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे ,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9823017169

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	रोहीणी शंशाक गुप्ते			1. मंडल अधिकारी,घोटावडे मंडल कार्,कार्यालय ,तामुळशी,जिपुणे ,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

Scanned with CamScanner

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., If any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

मी अशोक लक्ष्मण गवारी,वय-42 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9823017169.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन 01/08/2026 पासुन कार्यरत आहे. चार्ज आदेश दि.02/09/2026 रोजी श्री.प्रविण निंबाळकर ,पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,पुणे यांची पदोन्नतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,पुणे ते मुंबई शहर बदली झालेने त्याना कार्यमुक्त केलेने त्यांचेकडील कार्यभार वरीष्ठांचे आदेशाने माझ्याकडे देण्यात आला.कागदपत्रांचे अवलोकन करता तक्रारदार श्री.वैभव शंकर टेमकर यांचे लाच मागणी बाबत तक्रार असलेचे निदर्शनास आलेने दिलेल्या तक्रारीचे कागदपत्रांचे अवलोकन करता दि.24/07/2026 रोजी पोलीस निरीक्षक श्री.प्रविण निंबाळकर हे लाप्रवि कार्यालयात हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री.वैभव शंकर टेमकर यांचकडे लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगुन त्यासाठी प्रादेशिक परीवहन विभाग,पिंपरी चिंचवड येथील पंच 1) श्रीमती स्नेहल गौरव बोत्रे ,कनिष्ठ लिपीक प्रादेशिक परिवहन कार्यालय,पिंपरी चिंचवड 2) श्री.नरेश उत्तम राठोड वय-37 वर्षे वर्षे व्यवसाय नोकरी पद-कनिष्ठ लिपीक प्रादेशिक परिवहन कार्यालय,पिंपरी चिंचवड हे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचासमक्ष तक्रारदार यांनी तक्रार प्रथम तोंडी कथन करुन लेखी तक्रार दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

तक्रारदार श्री.वैभव शंकर टेमकर यांनी मौजे केमसेवाडी येथील सर्व्हे नं.52/10 हे 12 आर या खरेदी केलेल्या क्षेत्राची 7/12 व फेर फारवर नोंद केली म्हणुन महिला मंडल अधिकारी घोटावडे यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन स्वतरूसाठी व तलाठी यांचेसाठी म्हणुन दोघांचे दोन नोंदीचे पाच पाच ने दयायचे असे एकाचे दहा असे म्हणुन दोन नोंदीचे एकूण वीस हजार रुपयांची मागणी अशा आशयाची लेखी तक्रार दि.24/07/2026 रोजी दिली होती तक्रारीवर श्री.प्रविण निंबाळकर,पोलीस निरीक्षक,लाप्रवि व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. तसेच सदर तक्रारीसोबत लोकसेवक मडल अधिकारी श्रीमती गुप्ते यांनी त्याचा मोबा.क्र.9850125456 वरुन तक्रारदार त्याचा मो.क्र.8888606788 वर दि.22/07/2026 रोजी सकाळी 10.04 वा केलेल्या फोन कॉल चे रेकॉर्डींग मोबाईल मधुन पेन ड्राईव्ह मध्ये घेऊन सदर रेकॉर्डींग असलेला सॅनडीस्क कंपनीचा 8 जी बी जुना वापरता पेन ड्राईव्ह मध्य घेऊन पेन ड्राईव्ह सादर केला सदर संभाषणाची ऑडीओ रेकॉर्डींग ची स्क्रिप्ट पोलीस निरीक्षक,श्री.प्रविण निंबाळकर यांनी तक्रारदार यांचे समक्ष तयार केली सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांनी स्वतरूचा व लोकसेवक मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांचा आवाज ओळखुन सांगितले नुसार सदर संभाषणाची स्क्रिप्ट तयार करणेत आली सदर स्क्रिप्ट श्री.प्रविण निंबाळकर,पोलीस निरीक्षक,लाप्रवि व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.सदर संभाषणा दरम्यान श्रीमती गुप्ते यांनी तक्रारदार यांना "अहो काय झाल? असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी "कशाच? असे विचारल असता "त्या तुमच्या केमसेवाडी", हां,माग नव्हत्या केल्या का दोन नोंदी, "हा आता कधी आज या की,पौडला हाय का तुम्ही? असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे "मी आता मचंरलाय ला अॅक्च्युअली गावाला आलो होतो.दोन दिवसात येऊ का?" असे मंडल मॅडम गुप्ते यांना म्हणाले त्यावर "आता किती दिवस झाले तुम्ही ऑनलाईन पाठवा की,मग. असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी गुप्ते मॅडम यांना ," ऑनलाईन पाठवु का?" असे विचारले त्यावर गुप्ते मॅडम या तक्रारदार यांना "हां त्यांचे तलाठयाला दिलते का?" नाय नाय त्यांना नाय दिले.असे म्हणाले त्यावर गुप्ते मॅडम तक्रारदार यांना "मग दोघांचे पाठवा की." असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी "किती पाठवायचे?" असे मॅडम यांना विचारले त्यावर "तस नाय दोघांचे दोन नोंदीचे आता बघा की, पाच पाच नी दयायचे ना" असे मंडल मॅडम म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे म्हणजे "दहा हजार"असे विचारले त्यावर मंडल अधिकारी गुप्ते मॅडम या "आणि त्याचे दहा" असे म्हणाल्या.त्यावर तक्रारदार यांनी "बर ठिकय मी एक काम

Scanned with CamScanner

करतो तुम्हाला माझ्याकड कॅशय तशी ऑनलाईनला माझ्याकड एवढ पेमंट नाहीये मी येऊन देतो." असे म्हणाले त्यावर मडल मॅडम यांनी तक्रारदार यांना "कधी?,बर ,बघा आता परत मला फोन नका करायला लावु" असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी "अ अं परवा दिवशी येतो"

त्यानंतर तक्रारदार श्री.टेमकर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.28/07/2026 रोजी पुढील पडताळणी कारवाई करणेचे ठरले. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री.टेमकर यांचेकडे श्रीमती रोहीणी गुप्ते ,मंडल अधिकारी,घोटावडे मंडल कार्यालय, ता.मुळशी जि.पुणे हया लाच मागणी करतात अगर कस?े या पडताळणी करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये सॅनडिस्क कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचानी समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस. Sandisk uitra 16 GB C10 A1 micro SD 1U HC I व त्याचे दुस-या बाजुस 5386ZVUYN0HWBL MADE IN CHINA अशा वर्णनाचे असुन ते व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन तक्रारदार श्री.वैभव टेमकर यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र.1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 12.19 ते 12.26 वा.ची होती.सदर निवेदन घेतेवेळी 32 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याची आम्हा पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस VM Elite 32 GB C10 1 U V10 micro SD card व दुस-या बाजुस CEMM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे वर्णनाचे मेमेरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.टेमकर यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्रीमती बोत्रे यांचेसह पडताळणीकामी इंडस बायोटेक लिमीटडे ,घोटावडे गाव ,ता.मुळशी,जि.पुणे समोरील रोड येथुन घोटावडे मंडल कार्यालय ता.मुळशी जि.पुणे येथे रवाना केले ती वेळ 12.37 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 13.51 वा ची होती. त्यावेळी पंच क्र.01 श्रीमती बोत्रे यांना तक्रारदार टेमकर यांचे समक्ष गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे जुने घोटावडे सर्कल ऑफीस येथे गेलो सदर ऑफीस बंद होते.त्यानंतर आम्ही नवीन घोटावडे सर्कल ऑफीस येथे गेलो त्यावेळी तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना सर्कल मॅडम कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी मॅडम पौड मध्ये केमसेवाडी तलाठी ऑफीस येथे असल्याचे सांगितले.त्यावेळी तक्रारदार यांनी मंडल मॅडम यांचा फोन नंबर घेतला.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे चारचाकी गाडी ने पौड येथील तलाठी कार्यालयात गेलो तेथे त्या नव्हत्या त्यानंतर केमसेवाडी तलाठी ऑफीस येथे गेलो असता सदर ठिकाणी मंडल अधिकारी मॅडम यांची भेट झाली सदर वेळी मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांनी तक्रारदार यांना "आम्हाला का असे केले? आम्हाला काय नको का दयायला.?.. असे असते का? तुम्ही आले नाय,भेटले नाय तरी आम्ही नोंद मंजुर करायच थाबलो का.. ?" असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे "नाय थांबले पण विषय कसा ये थोडासा" असे म्हणाले त्यावर त्या "परत आयो यायचचय तुम्हाला" असे म्हणाल्या त्यानंतर तक्रारदार "कस काय करायच सांगा" असे म्हणाले असता मंडल मॅडम "तुमीच करायचे.. कस काय.. काय नेहमीच्या माणसांना.. आपल.. सांगाव लागत का..?" असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी "किती म्हणताय तुम्ही आता?" असे विचारले असता "तुमी तुमच्या हयान दया.. आम्ही नाय म्हणत... तुम्हीच दया आम्ही.. आम्ही म्हणत नाय.." असे म्हणुन "तुम्ही तुमच्या हयान देऊन जायच कन्फर्म काय..." असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार हे "तुमी त्या दिवशी म्हणल्या म्हणुन म्हणल." असे म्हणाले.त्यावर "तुम्हीच दयायचे काय. अस काय नाय",असे मंडल मॅडम म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी काय करायचे सांगा असे विचारले असता "तुमी ते करायच काय सांगाय लागत." असे म्हणुन "तुम्हीच दयायच .....तुमी दयायच तर दया नाहीतर.... लहान मुलासारख मला नाय आवडत.." असे मंडल अधिकारी मॅडम म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी "5 देऊ का?" असे विचारले असता मंडल अधिकारी गुप्ते मॅडम या "दया" असे म्हणाल्या.त्यावर तक्रारदार "ठिके. करतो.. घेऊन येऊ का..?"असे विचारले असता मंडल मॅडम "ह"असे म्हणाल्या त्यावेळी तक्रारदार यांनी मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांना ऑनलाईन करु का?"असे विचारले असता नाय नाय" असे म्हणाल्या सदर वेळी मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांनी तक्रारदार यं ाचेकडे त्यांचे मौजे केमसेवाडी येथील सव्हे नं.52ध10 हे 12 आर या खरेदी केलेल्या क्षेत्राची 7/12 व फेर फारवर नोंद केली म्हणुन पाच हजार रुपये मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी पंच क्र.01 श्रीमती बोत्रे यांचे प्रमाणे हकिकत सांगुन त्या सुरवातीपासुन शेवटपर्यंत माझे बरोबर होत्या असे सांगितले.

त्यानतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची

Scanned with CamScanner

खात्री केली असता सदर पडताळणी वेळी तक्रारदार यांनी मौजे केमसेवाडी येथील सर्व्हे नं.52/10 हे 12 आर या खरेदी केलेल्या क्षेत्राची 7/12 व फेर फारवर नोंद केली म्हणुन, मंडल अधिकारी,घोटावडे यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन तक्रारदार याचेकडे पंचासमक्ष पाच हजार रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झालेने तक्रारदार यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी सांगितले की,माझे वैयक्तिक काम असल्याने आज रोजी लाच रक्कम घेऊन जाणेस मला शक्य नाही मी आपणास संपर्क करेन त्यावेळी घोटावडे मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांनी मागणी केलेली पाच हजार लाच रक्कम घेऊन येतो त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितलेने दि. 28/07/2026 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली सदर बाबत पोलीस निरीक्षक ,निंबाळकर यांनी सविस्तर पचनामा केला आहे.

दि.05/08/2026 रोजी तक्रारदार टेमकर यांनी पुढील कारवाई कामी पोलीस निरीक्षक , निंबाळकर यांना संपर्क केलेने दोन्ही पंच व पोलीस निरीक्षक निंबाळकर,सापळा पथक घोटावडे येथे गेले सदर वेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष मंडल अधिकारी गुप्ते मॅडम घोटावडे मंडल कार्यालय,ता.मुळशी ,जि.पुणे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेसाठी घेऊन जातो असे सांगितलेने पोलीस निरीक्षक ,निंबाळकर यांनी सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई सुरू केली.तसेच पंच क्रं 2 नरेश राठोड यांचे एवजी पंच क्रं 2 म्हणुन श्री अमर बळीराम यादव राज्य करनिरीक्षक वस्तु व सेवा कर भवण येरवडा हे काम पाहतील असे ठरवले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार वैभव टेमकर यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 5,000/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर पोलीस निरीक्षक निंबाळकर व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सागुन प्रात्यक्षिक दाखवुन सदर नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा तक्रारदार यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली.सापळा कारवाई करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये यापुर्वी कारवाई करीता वापरलेले व सिलबद करुन ठेवलेले सॅनडिस्क कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमध सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस Sandisk uitra 16 GB C10 A1 micro SD 1U HC I व त्याचे दुस-या बाजुस 5386ZVUYN0HWBL MADE IN CHINA अशा वर्णनाचे मेमरी कार्ड टाकले त्यामध्ये सापळा कारवाईचे अनुषगाने प्रथम तक्रारदार टेमकर त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती वेळ 12.24 वा ची होती.सदर वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यावेळी मी तक्रारदार पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच क्र.2 यादव यांचेसह तक्रारदार यांचे चारचाकी मधुन सापळा कारवईकामी रवाना केले ती वेळ 12.52 वा ची होती.त्यांचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.01 असे रवाना झालो व घोटावडे मंडल कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीलो. थोडया वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यांचेसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 13.11 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, ते पंच यांचेसह लाच रक्कम देणेसाठी घोटावडे मंडल कार्यालय,घोटावडे ता.मुळशी,जि.पुणे येथे गेले असता सदर ठिकाणी श्रीमती गुप्ते ,मंडल अधिकारी या उपस्थित नसलेने ते लाच रक्कम न देता परत आले त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता त्यांनी मी आपणास संपर्क करेन त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितलेने त्या दिवशी कारवाई स्थगित केली.सदर बाबत पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानतर आम्ही तक्रारदार टेमकर यांना पुढील कारवाई कामी दि.15/09/2026, रोजी संपर्क केला असता त्यांनी पुढील कारवाई कामी मी आपणास संपर्क करेल त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितले त्यानंतर दि. 22/09/2026 रोजी तक्रारदार यांना पुन्हा संपर्क केला असता तक्रारदार यांनी दि.23/09/2026 रोजी कारवाई कामी ऑर्कीड इंटरनॅशनल स्कुल जवळ ,घोटावडे,ता.मुळशी ,जि.पुणे येथे बोलावलेने आम्ही दोन्ही पंच व सापळा पथक घोटावडे येथे गेलो सदर वेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष श्रीमती गुप्ते,मंडल अधिकारी, घोटावडे मंडल कार्यालय,ता.मुळशी ,जि.पुणे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेसाठी घेऊन जातो असे सांगितलेने सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार टेमकर त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती 11.27 वा ची वेळ होती.सदर वेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांचेकडे दि.05/08/2026 रोजी सापळा कारवाई वेळी तक्रारदार यांनी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांचेकडे हजर केलेली अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम 5000/- सुरक्षितपणे सिलबंद लिफाफयामध्ये ठेवलेली बाहेर काढुन त्यास पुन्हा अॅन्थ्रासीन पावडर लाऊन सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या

Scanned with CamScanner

खिशात ठेऊन दिली व त्यांना व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र.02 यादव यांचेसह लोकसेवक मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांची भेट घेणेकामी त्यांचे घोटावडे मंडल कार्यालय येथे ऑर्किड इंटरनॅशनल स्कुल जवळुन रवाना केले ती वेळ 11.48 वा ची होती.त्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक शासकिय वाहनामधुन रवाना झाला.त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र.02 यादव यांचेसह घोटावडे मंडल कार्यालयात गेले व सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजुचे परीसरात थांबुन राहीलो थोडया वेळाने तक्रारदार हे पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यादव यांचेसह त्यांचे चारचाकी वाहनात बसुन रवाना झाले त्यानंतर सापळा पथक त्यांचे पाठीमागे रवाना झाले.तक्रारदार यांनी त्यांचे वाहन ऑर्किड इंटरनॅशनल स्कुल जवळ थांबवले त्यापाठोपाठ शासकिय वाहन थांबवले व पोशि महामुलकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.08 वा ची होती. त्यावेळी आम्ही पंच 02 यादव यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता पंच 2 यादव यांनी सांगितले की, मी व तक्रारदार टेमकर असे मंडल कार्यालय येथे गेलो सदर ठिकाणी मंडल अधिकारी रोहीणी गुप्ते मॅडम व देसाई तलाठी व इतर लोक उपस्थित होते त्यांचेशी मंडल अधिकारी गुप्ते मॅडम यांचे बोलणे चालले होते त्यावेळी गुप्ते मॅडम यांना तक्रारदार यांनी "बोजा कमी करायचा होता.". असे म्हणाले त्यावेळी मंडल अधिकारी श्रीमती गुप्ते मॅडम यांनी तक्रारदार यांना "तलाठयांना सांगा, तलाठी करुन देईल" असे म्हणुन निघुन गेल्या. त्यानंतर मी व तक्रारदार असे सापळा कारवाई कामी रवाना केले ठिकाणी परत आलो.त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार टेमकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी पंच क्र.02 यादव यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,पुणे येथे हजर राहुन सांगितले की, दि.28/07/2026 रोजी च्या पडताळणी दरम्यान माझे मौजे केमसेवाडी येथील सव्हे नं.52/10 हे 12 आर या खरेदी केलेल्या क्षेत्राची 7/12 व फेर फारवर नोंद केली म्हणुन मागणी केलेली पाच हजार रुपये लाच रक्कम श्रीमती रोहीणी गुप्ते महिला मंडल अधिकारी घोटावडे मंडल कार्यालय, ता.मुळशी जि.पुणे यांनी कार्यालयात इतर व्यक्ती असलेने माझेकडे 5000/- लाच रक्कमे विषयी चर्चा केली नाही आणि यापुढेही त्या माझे कडुन 5000/- हजार रुपये लाच रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही.

तरी तक्रारदार श्री.वैभव शंकर टेमकर यांनी दिनांक 24/07/2026 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. 28/07/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार टेमकर यांचेकडे त्यांचे मौजे केमसेवाडी येथील सव्हे नं.52/10 हे 12 आर या खरेदी केलेल्या क्षेत्राची 7/12 व फेर फारवर नोंद केली म्हणुन तक्रारदार टेमकर यांचेकडे श्रीमती रोहीणी शंशाक गुप्ते,मंडल अधिकारी,घोटावडे मंडल कार्यालय ,ता.मुळशी,जि.पुणे यांनी स्वतरूचे आर्थिक फायदयाकरीता पारीतोषण म्हणुन 5000/- रुपये लाच मागणी करुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले म्हणुन श्रीमती रोहीणी शशाक गुप्ते,मंडल अधिकारी ,घोटावडे मंडल कार्यालय, ता.मुळशी,जि. पुणे यांचे विरुध्द माझी सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

mahesh namdeo meshram(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

dgmmmm8101

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): mahesh namdeo me
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): dgpmnmm8101

पोलीस ठाणे अंमलदार
पौड पोलीस स्टेशन

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with CamScanner